दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

कंपन्या, संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या सहभागातून अतिरिक्त निधी उभारणार

मुंबई : दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती आणि अन्य आपत्कालीन परिस्थितीत बाधित नागरिकांसह आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मदत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या व्यवस्थेद्वारे कंपन्या, सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या सहभागातून अतिरिक्त निधी उभारण्यात येणार आहे. हा निधी गरजू रुग्णांच्या उपचारांसह आपत्तीग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी वापरता येणार आहे.

1440 वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती; ग्रामीण सेवेला बळकटी

मुंबई: महाराष्ट्र सरकारने जनतेला उत्कृष्ट दर्जाची आरोग्य सुविधा मिळावी यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सामान्य, खेड्या पाड्यातील, दुर्गम आणि आदिवासी भागातील नागरिकांना उत्तम दर्जाची आरोग्य व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतला आहे. यासाठी महाराष्ट्र सरकारने सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या भरतीला प्राधान्य दिले आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र वैद्यकीय आणि आरोग्य सेवा गट-अ (S-20) गटातील 1 हजार 440 वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती आदेश वितरित करण्याचा विशेष समारंभ उद्या 4 नोव्हेंबरला आयोजित करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. ०४ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १९२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

जिरायती शेतीसाठी आता प्रतिहेक्टरी ११ हजार रुपये; मृतांच्या कुटुंबीयांना आठ लाख, फळबागांच्या नुकसानीसाठी ३० हजार रुपये

मुंबई : दुष्काळ, अतिवृष्टी आणि अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसह नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीत केंद्र सरकारने वाढ केली आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या (एनडीआरएफ) अंतर्गत भरपाईचे दर आणि निकष सुधारण्यात आले असून, जिरायती शेतीच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टरी 11 हजार रुपये, बागायती शेतीसाठी 22 हजार रुपये, तर फळबागांच्या नुकसानीसाठी 30 हजार रुपये मदत मिळणार आहे. नैसर्गिक आपत्तीत मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना मिळणारी सानुग्रह मदतही चार लाखांवरून आठ लाख रुपये करण्यात आली आहे.

केंद्र सरकारने शेती, फळबागा, पशुधन आणि घरांच्या नुकसानीसाठी सुधारित दर निश्चित केले आहेत. त्यानुसार जिरायती शेतीच्या नुकसानीसाठी यापूर्वी प्रतिहेक्टरी आठ हजार 500 रुपये दिले जात होते. आता ही रक्कम 11 हजार रुपये करण्यात आली आहे. बागायती शेतीसाठीची मदत 17 हजारांवरून 22 हजार रुपये, तर फळबागांच्या नुकसानीसाठीची मदत 22 हजार 500 रुपयांवरून 30 हजार रुपये प्रतिहेक्टरी करण्यात आली आहे.

टोयोटा किर्लोस्कर मोटरची 30,360 वाहनांची विक्री

बंगळुरू:टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने ऑक्टोबर २०२६ महिन्यातील विक्रीची आकडेवारी जाहीर केली असून,कंपनीने या महिन्यात एकूण ३०,३६० वाहनांची विक्री नोंदवली आहे. यामध्ये देशांतर्गत बाजारपेठेत २९,५२१ वाहनांची विक्री झाली असून, ८३९ वाहनांची निर्यात करण्यात आली आहे.कॅलेंडर वर्ष २०२६ मधील जानेवारी ते ऑक्टोबर या दहा महिन्यांच्या कालावधीत टोयोटा किर्लोस्कर मोटरने एकूण ३,२५,२७४ वाहनांची विक्री केली आहे. मागील वर्षी याच कालावधीत कंपनीने ३,१५,७१६ वाहनांची विक्री केली होती. त्यामुळे कंपनीच्या एकूण विक्रीत ३ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. देशांतर्गत बाजारपेठेतील विक्री २०२५ मधील २,८७,३३८ वाहनांवरून वाढून २०२६ मध्ये २,९९,१४० वाहनांवर पोहोचली असून, त्यात ४ टक्क्यांची वाढ झाली आहे. दुसरीकडे, निर्यात २०२५ मधील २८,३७८ वाहनांवरून २०२६ मध्ये २६,१३४ वाहनांवर आली असून, त्यात ८ टक्क्यांची घट नोंदवण्यात आली आहे.

मोबीक्विकने सर्वाधिक पॅट आणि ईबीआयटीडीए नोंदवला

मुंबई : भारतातील सर्वात मोठे डिजिटल वॉलेट, वन मोबीक्विक सिस्टीम्स लिमिटेडने आज ३० सप्टेंबर, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे निकाल जाहीर केले. कंपनीने सलग चौथ्या नफ्याच्या तिमाहीची नोंद केली असून, करानंतरचा नफा ₹११.८ कोटी आणिईबीआयटीडीए₹२२.७ कोटी आहे, जो आतापर्यंतचा सर्वाधिक तिमाही पॅट आणि ईबीआयटीडीएआहे. एकूण महसूल ₹३०२.८ कोटी होता. प्लॅटफॉर्म जीएमव्हीने (GMV) ₹५९,६७७ कोटींचा नवा तिमाही उच्चांक गाठला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ३५% वाढ दर्शवतो. त्याचबरोबर, आर्थिक वर्ष २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीत कर्जवाटप मागील वर्षाच्या तुलनेत ३४% वाढून ₹१,०८२.६ कोटींवर पोहोचले. ही दमदार कामगिरी वाढत्या जीएमव्ही वाढीमुळे आणि सुधारित ऑपरेटिंग मार्जिनमुळे झाली, जी कंपनीच्या व्यवसाय मॉडेलची ताकद आणि विस्तारक्षमता दर्शवते.मोबीक्विकसाठी आर्थिक वर्ष २०२७ ची दुसरी तिमाही ही सलग दुसरी नफ्याची तिमाही ठरली. कंपनीच्या मुख्य क्षेत्रांमधील वाढ आणि संपूर्ण व्यवसायातील सुधारित कार्यात्मक कामगिरीमुळे हे शक्य झाले. कामकाजातून मिळणारा महसूल वार्षिक ९% नी वाढून ₹२९५.७ कोटी झाला, तर



शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या सरकारला जाब विचारणार, आदित्य ठाकरे यांचा मोठा मोर्चा काढण्याचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

वैजापूर : अतिवृष्टी, पीक विमा, नुकसानभरपाई आणि कर्जमाफीच्या प्रश्नांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले असून, जाहीर केलेली पाच हजार रुपयांची मदतही अनेक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. पाच हजार रुपयांत शेतकऱ्यांची दिवाळी होणार आहे का, असा सवाल करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारण्यासाठी मोठा मोर्चा काढणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

वैजापूर तालुक्यातील गारज आणि कन्नड तालुक्यातील जेहूर येथे दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी ठाकरे शेतकऱ्यांच्या बांधावर गेले होते. यावेळी त्यांनी सोयाबीन, तूर, मूग आणि कापूस पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

गारज येथील तरुण शेतकरी कडुबा त्रिभुवन यांनी शेतीतील नुकसानीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाची व्यथा मांडली. मुलींची दिवाळी कशी करायची, त्यांना माहेरी आणायचे कसे, असा प्रश्न पडल्याचे त्यांनी सांगितले. मुलींना माहेरी आणण्याचीही



भीती वाटत असल्याची भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. सरकारची पाच हजार रुपयांची मदत म्हणजे 'लबाडाचे आवतन' ठरल्याची टीकाही शेतकऱ्यांनी केली.

मागील वर्षीचा पीक विमा, अतिवृष्टीची नुकसानभरपाई आणि जाहीर केलेली ३२ हजार कोटी रुपयांची मदत अद्याप मिळाली नसल्याचा मुद्दा ठाकरे यांनी उपस्थित केला. कर्जमाफीच्या यादीत नाव असूनही प्रत्यक्ष कर्जमाफी मिळत नसल्याचेही त्यांनी सांगितले. राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला असताना शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळत नसल्याची टीका त्यांनी केली.

नाशिकमधील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कार्यक्रमांसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना संकटातील शेतकऱ्यांना मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. दुष्काळाबाबत केवळ घोषणा न करता ठोस कृती करावी. शेतकऱ्यांनी एकजूट होऊन आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा. शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

यावेळी शिवसेना नेते अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे, उपनेते सुभाष पाटील, माजी आमदार उदयसिंग राजपूत, बाबासाहेब मोहिते, बबन जाधव, रमेश सावंत, मनाजी पाटील मिसाळ, संजय मोटे, मनोज गायके, संजय निकम, कल्याण चव्हाण, भरत मिसाळ, सतीश जिवरख, बाळासाहेब बडक, धर्मराज दानवे, विठ्ठल डमाळे, उमेश मोकासे, अक्षय साठे, योगेश पवार, हरिष पाटील, महिला आघाडीच्या पद्मा शिंदे व अर्चना सोमासे यांच्यासह शिवसैनिक आणि शेतकरी उपस्थित होते.

महसूल विभागातील संगणक अभियंत्यांची पदे तातडीने भरा!

नेटवर्क अभियंत्यांना प्राधान्य देण्याची संजय केणेकर यांची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महसूल विभागातील संगणक अभियंत्यांची रिक्त पदे बाह्यस्त्रोतामार्फत तातडीने भरण्यात यावीत, तसेच यापूर्वी नेटवर्क अभियंता म्हणून काम केलेल्या अनुभवी तंत्रज्ञांना नियुक्ती प्रक्रियेत प्राधान्य द्यावे, अशी मागणी माजी आमदार संजय केणेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. यावर बावनकुळे यांनी सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले.

महसूल विभागाच्या सुधारित आकृतिबंधानुसार संगणक अभियंत्यांची पदे बाह्यस्त्रोतामार्फत भरण्याबाबत शासनाने ६ ऑक्टोबर २०२६ रोजी स्पष्ट निर्देश दिले



आहेत. मात्र, राज्यातील अनेक जिल्ह्यांत अद्याप नियुक्ती प्रक्रिया सुरू झालेली नाही. त्यामुळे अनेक वर्षांपासून महसूल विभागात सेवा देणाऱ्या नेटवर्क अभियंत्यांच्या रोजगाराचा प्रश्न प्रलंबित आहे. या तंत्रज्ञांनी कोविड काळापासून विविध शासकीय पोर्टल, आधार केंद्रे, निवडणूक प्रक्रिया तसेच अन्य महत्त्वाच्या शासकीय कामांमध्ये योगदान दिले आहे. त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि सेवेचा विचार करून नियुक्ती प्रक्रियेत त्यांना प्राधान्य द्यावे, तसेच शासन निर्णयाची राज्यातील सर्व जिल्ह्यांत तातडीने अंमलबजावणी करावी, अशी आग्रही मागणी शिष्टमंडळाने केली. महसूलमंत्री बावनकुळे यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत लवकरात लवकर सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. अनुभवी तंत्रज्ञांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी हा पाठपुरावा करण्यात आला.



शिवसेनेचे युवा नेते माजी मंत्री आदित्य उद्धव ठाकरे ही छत्रपती संभाजीनगर जिल्हाचे दौऱ्यावर आले असता खुलताबाद पंचायत समितीच्या प्र सभापती मंदाताई बद्री वाकळे तालुक्याचे शिवसेना नेते बद्री नाना वाकळे यांनी सदिच्छा भेट घेतली याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख आ अंबादास दानवे कन्नड ची माजी आमदार उदय सिंग राजपूत यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होतेR

महाराष्ट्र पोलीस दलात फेरबदल, पंधरा आयपीएस, आरपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई : महाराष्ट्र पोलीस दलातील 15 आयपीएस आणि आरपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश गृह विभागाने जारी केले आहेत. त्याचप्रमाणे ठाणे शहर पोलीस दलातील तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या पदावर एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. अमरसिंग जाधव, प्रशांत कदम आणि शिवराज पाटील यांचा त्यात समावेश आहे.

पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक एकच्या शिफारशीनुसार या बदल्या करण्यात आल्या आहेत. ठाणे शहर पोलीस दलातील गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमरसिंग जाधव आणि परिमंडळ क्रमांक पाचचे पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच कोकण परिक्षेत्राच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील शिवराज पाटील यांनाही मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणाच्या तपासाच्या पार्श्वभूमीवर अमरसिंग जाधव आणि प्रशांत कदम यांना मुदतवाढ दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.

एसटी कर्मचाऱ्यांचे घंटानाद आंदोलन प्रलंबित मागण्यासाठी

मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

परभणी**महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या वतीने प्रलंबित व आर्थिक सेवा विषयक मागण्याकडे प्रशासनाचे अचूक लक्ष वेधण्यासाठी दिनांक 3 नोव्हेंबर मंगळवार रोजी पात्री आगारासमोर कर्मचाऱ्यांनी घंटा नाद आंदोलन केले दुपारी बारा ते एक या वेळेत झालेल्या या घंटानाद आंदोलनामध्ये



कर्मचाऱ्यांनी घंटानादकरून आपल्या मागण्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले होते कामगारांच्या या प्रलंबित आर्थिक प्रश्नावर वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक तोडगा न निघाल्यामुळे संघटनेने राज्यव्यापी आंदोलनाची हाक दिली असून या आंदोलनात दुसऱ्या टप्प्यांमध्ये दिनांक चार नोव्हेंबर बुधवार रोजी द्वार सभा प्रदर्शने करण्यात येणार आहेत त्यानंतर मागण्या मान्य न झाल्यास दिनांक पाच नोव्हेंबर गुरुवारपासून राज्यात बेंबुदत्त धरणे आंदोलने सुरू करण्याचा इशारा संघटनेमार्फत देण्यात आलेला आहे

दुष्काळग्रस्तांसाठी मनपाची माणुसकीची शिदोरी; 71 लाखांची मदत मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द!

3307 अधिकारी-कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन, तर 119 नगरसेवकांचे महिन्याचे मानधन मदतनिधीत

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : संकटाच्या काळात माणुसकीचा हात पुढे करणारी संवेदनशीलता आज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह नगरसेवकांनी दाखवून दिली. राज्यातील दुष्काळग्रस्त गावांमधील नागरिकांना मदतीचा आधार मिळावा, या सामाजिक बांधिलकीतून महानगरपालिकेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन, तर नगरसेवकांनी एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दिले. या माध्यमातून जमा झालेल्या ७१ लाख ४ हजार ९०२ रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे १ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध विकासकामांच्या लोकार्पणासाठी आले असता हा धनादेश त्यांच्याकडे प्रदान करण्यात आला. महापौर समीर राजूरकर आणि महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते हा धनादेश मुख्यमंत्र्यांना देण्यात आला. या उपक्रमात महानगरपालिकेच्या ३३०७ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या एक दिवसाच्या वेतनातून ५९ लाख १४ हजार ९०२ रुपयांचे योगदान दिले. तर ११९ नगरसेवकांनी एक महिन्याचे मानधन म्हणून ११ लाख ९० हजार रुपये मदतनिधीसाठी दिले.

दुष्काळामुळे ग्रामीण भागातील नागरिकांसमोर निर्माण होणाऱ्या अडचणींची जाणीव ठेवत महानगरपालिकेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने या उपक्रमात सहभाग नोंदविला. आपल्या वेतनातील एक दिवसाचा हिस्सा देत त्यांनी संकटग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी हातभार लावला. विशेष म्हणजे, लोकप्रतिनिधींनीही महिन्याचे मानधन देत या सामाजिक उपक्रमात सहभाग घेतला.

महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी आणि नगरसेवकांनी एकत्रितपणे दिलेल्या या योगदानाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले. प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून एकत्रितपणे मदतीसाठी पुढाकार घेणे, ही निश्चितच माणुसकीची आणि सामाजिक एकतेची प्रेरणादायी बाब ठरली आहे.

विकासकामांच्या लोकार्पणासोबतच मदतीचा हा हात पुढे करून महानगरपालिकेने केवळ शहराच्या विकासाचीच नव्हे, तर संकटात सापडलेल्या राज्यातील बांधवांच्या वेदनांशी नाते जोडण्याचीही भूमिका अधोरेखित केली.

टीबीमुक्त महाराष्ट्रासाठी राज्यात 300 अत्याधुनिक टूनॅट यंत्रे बसविणार

मुंबई: महाराष्ट्राला क्षयरोगमुक्त करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यभरात 300 अत्याधुनिक 'टूनॅट क्वात्रो' आण्विक निदान यंत्रे बसविण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना जलद, अचूक आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे. तसेच राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हास्तरीय आरोग्य संस्थांमध्ये ही यंत्रे बसविण्याची योजना आहे. जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता असलेल्या या तंत्रज्ञानामुळे क्षयरोगाचे निदान अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार आहे.

या प्रकल्पासाठी सुमारे 41.92 कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, त्याची अंमलबजावणी 21 महिन्यांत केली जाणार आहे. यासाठी बीपीसीएल फाउंडेशन, एचआयटीईएस–एचएलएल इन्फ्रा टेक सर्व्हिसेस लिमिटेड आणि आरोग्य सेवा संचालनालयातील क्षयरोग व कुष्ठरोग विभागाचे सहसंचालक यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे.

'टूनॅट क्वात्रो' यंत्रांच्या माध्यमातून अवघ्या एका तासात क्षयरोगासह रिफॅम्पिसिन-प्रतिरोधक क्षयरोगाचे निदान करणे आता शक्य होणार आहे. ही यंत्रे पोर्टेबल असून बॅटरीवर चालवण्यात येत आहेत. त्यामुळे वीजपुरवठ्याच्या मर्यादा असलेल्या दुर्गम भागांतही त्यांचा प्रभावी वापर करता येणार आहे. यंत्रांच्या संचालनासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार असून, निक्षय डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवली जाणार आहे.

दुष्काळात शेतकऱ्यांना छळाल तर खबरदार! मायक्रो फायनान्स कंपन्यांना जिल्हाधिकाऱ्यांचा सज्जड दम!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

दुष्काळाच्या झळांनी आधीच आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मागे कर्जवसुलीचा तगादा लावू नका, अशा स्पष्ट शब्दांत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी मायक्रो फायनान्स कंपन्यांना बजावले आहे. शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांकडून कोणत्याही प्रकारची सक्तीची वसुली सहन केली जाणार नाही, असा ठाम इशाराही त्यांनी दिला. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी जिल्ह्यातील मायक्रो फायनान्स कंपन्या तसेच



बिगर बँकिंग वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी गौडा यांनी दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वसुलीबाबत शासनाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश दिले. दुष्काळामुळे शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. अशा वेळी कर्ज किंवा अन्य आर्थिक व्यवहारांच्या नावाखाली त्यांच्यावर दबाव आणणे अथवा सक्तीने वसुली करणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांचा संदर्भ देत जिल्हाधिकाऱ्यांनी वित्तीय संस्थांना नियमांचे पालन करण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागात अन्य व्यावसायिक कारणांसाठी जाण्याची आवश्यकता असल्यास संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींनी गावचे सरपंच, पोलीस पाटील आणि ग्राम महसूल अधिकारी यांना पूर्वसूचना देऊनच गावात जावे, असेही त्यांनी बजावले. ग्रामीण भागात वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींच्या हालचालींबाबत स्थानिक प्रशासनाला माहिती असणे आवश्यक असल्याचे या निर्देशांतून स्पष्ट झाले.

बैठकीला अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था समृत जाधव, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे यांच्यासह विविध मायक्रो फायनान्स कंपन्यांचे संचालक व प्रतिनिधी उपस्थित होते.

सक्ती झाली तर थेट तक्रार करा!

दरम्यान, कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्जवसुलीसाठी तगादा लावला जात असेल, मानसिक दबाव आणला जात असेल किंवा सक्तीचा अवलंब केला जात असेल, तर शेतकरी आणि ग्रामस्थांनी गप्प न बसता प्रशासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षाचा ०२४०-२३३१०७७ हा क्रमांक तसेच १८०० १०२ १०८० हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना आधार देण्याऐवजी त्यांच्यावर वसुलीचा दबाव वाढवला जाणार नाही, याची जबाबदारी आता वित्तीय संस्थांवर आहे. प्रशासनाने दिलेल्या या स्पष्ट निर्देशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते की नाही, याकडे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर
बुधवार, दि. ०४ नोव्हेंबर २०२६

संपादकीय

अन्नभेसळ, एफडीएची कारवाई आणि नागरिकांचे आरोग्य

दिवाळीसारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) राज्यभरात मोहीम उघडून केलेली धडक कारवाई ही अत्यंत कौतुकास्पद आणि नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणारी आहे. मुंबई, पुणे, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अमरावती आणि नागपूर अशा विविध विभागांतून ४५ लाख रुपयांचा संशयास्पद व भेसळयुक्त मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मुंबईतील चेंबूर परिसरात अस्वच्छ व अनियंत्रित तापमानात लक्झरी बसमधून वाहतूक केला जाणारा ४ हजार किलोपेक्षा जास्त स्वीट हलवा व मिठाईचा साठा जप्त करणे असो, किंवा ५ दुकानांचे परवाने निलंबित करून २ दुकानांना सील ठोकणे असो; एफडीएने दाखवलेली ही प्रशासकीय तत्परता भेसळबाजांचे धाबे दणाणवणारी ठरली आहे. सणासुदीच्या काळात बाजारपेठांमध्ये मिठाई, खवा, फरसाण आणि खाद्यतेलाची मागणी प्रचंड प्रमाणात वाढते. याच संधीचा गैरफायदा घेत काही नफेखोर व्यापारी आणि उत्पादक मानवी आरोग्याशी खेळून निकृष्ट, भेसळयुक्त व असुरक्षित अन्नपदार्थांची निर्मिती व विक्री करतात. यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम आणि कोकण विभागात आढळलेल्या अस्वच्छ परिस्थितीतील निर्मिती, लेबलिंगमधील त्रुटी आणि प्रतिबंधित पदार्थांची अवैध वाहतूक यांसारख्या बाबी अन्न सुरक्षेतील गंभीर निष्काळजीपणा अधोरेखित करतात. अशा गुन्हेगारांवर केवळ जप्तीची कारवाई न करता, दाखल झालेल्या गुन्ह्यांच्या आधारे कठोर कायदेशीर शिक्षा होणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांना दर्जेदार आणि सुरक्षित अन्नपदार्थ मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. प्रशासनाने केवळ सणासुदीपुरती ही मोहीम सीमित न ठेवता वर्षभर अशा तपासण्यांचे सत्र सुरू ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे, नागरिकांनीही मिठाई व खाद्यपदार्थ खरेदी करताना अधिकृत व स्वच्छ आस्थापनांमधूनच खरेदी करून जागरूक राहिले पाहिजे. सणाचा आनंद लुटताना कोणाच्याही आरोग्याला धोका पोहोचणार नाही, याची काळजी घेणे ही शासन आणि समाज या दोघांचीही संयुक्त जबाबदारी आहे.

शेतात जाण्यासाठी गाडीवाट मिळावी; पार्वतीबाई चापके यांचे आमरण उपोषण सुरू



हिंदू प्रकाश वार्ता प्रातीनिधी

परभणी : शेतात जाण्यासाठी कायमस्वरूपी गाडीवाट उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी पार्वतीबाई चापके यांनी प्रशासनाकडे धाव घेतली असून, मागणीची दखल घेतली जात नसल्याने त्यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.

पार्वतीबाई चापके यांनी यापूर्वी दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधित प्रशासनाकडे शेतात जाण्यासाठी गाडीवाट मिळण्याबाबत लेखी अर्ज सादर केला होता. मात्र, अर्ज देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

शेतात जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे शेतीच्या कामांसह इतर अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. प्रशासनाने वारंवार मागणी करूनही प्रश्न सोडविला नसल्याने अखेर त्यांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

सकाळी १० वाजल्यापासून त्यांनी उपोषण सुरू केले असून, प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन शेतात जाण्यासाठी गाडीवाट उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

आता प्रशासन या उपोषणाची दखल घेऊन संबंधित शेतकऱ्याचा गाडीवाटेचा प्रश्न मार्गी लावणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्रात सुका दुष्काळ आणि माझी जबाबदारी!

पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणे ही केवळ गरज नाही, तर पुढच्या पिढीशी केलेली नैतिक बांधिलकी!

आभाळाकडे डोळे लावून बसलेला शेतकरी, पाण्यासाठी मैलोनमैल चालणारी महिला, चारा नसल्याने कृश झालेली जनावरे, कोरड्या विहिरीत डोकावणारे गाव आणि पाण्याच्या टँकरभोवती लागलेल्या रांगा...हे एखाद्या चित्रपटातील दृश्य नाही. महाराष्ट्रातील अनेक गावांचे हे वास्तव आहे. दुष्काळ केवळ जमिनीवर पडलेल्या भेगांमध्ये दिसत नाही, तो शेतकऱ्याच्या काळजात पडतो, कुटुंबाच्या स्वप्नांना तडे देतो आणि संपूर्ण समाजाच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. म्हणूनच आज प्रश्न केवळ 'महाराष्ट्रात दुष्काळ का पडतो?' हा नाही, तर 'दुष्काळाच्या संकटात माझी जबाबदारी काय?' हा आहे. २०२६ मध्ये महाराष्ट्रातील ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाल्याची बातमी आली. पावसातील तूट, दीर्घ कोरडे कालखंड आणि पिकांचे नुकसान यामुळे ग्रामीण जीवनावर मोठे संकट आले आहे. ही आकडेवारी केवळ सरकारी अहवालातील संख्या नाही, त्या प्रत्येक आकड्यामागे एका शेतकऱ्याचे मोडलेले स्वप्न, एका कुटुंबाची चिंता आणि एका गावाची तहान दडलेली आहे.

महाराष्ट्रात पावसाचे वितरण समान नाही. काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत पावसाची प्रतीक्षा, ही परिस्थिती वारंवार दिसते. हवामान बदल, वाढते तापमान आणि अनियमित पर्जन्यमान यामुळे शेतीसमोरील आव्हाने अधिक गंभीर होत आहेत. मात्र प्रत्येक वेळी निसर्गाला दोष देऊन आपण आपली जबाबदारी झटकू शकत नाही. पाऊस कमी पडणे आपल्या हातात नाही, पण पडलेला पाऊस अडवणे, जमिनीत मुरवणे आणि काटकसरीने वापरणे नक्कीच आपल्या हातात आहे. एका बाजूला पाण्याचा प्रत्येक थेंब मोलाचा असताना दुसऱ्या बाजूला पाण्याचा बेसुमार वापर, भूजलाचा अनियंत्रित उपसा, नाल्यांवरील अतिक्रमणे, जलस्रोतांमधील गाळ आणि पाण्याच्या नियोजनाचा अभाव दिसतो. ऊसासारख्या अधिक पाणी लागणाऱ्या पिकांचे अयोग्य क्षेत्रात वाढते प्रमाण, पीकपद्धतीतील असमतोल आणि पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घेतलेले शेतीविषयक निर्णयही संकट वाढवतात. धरणे असूनही काही भाग तहानलेले राहतात, ही केवळ पाण्याची नव्हे तर व्यवस्थापनाचीही समस्या आहे.

दुष्काळाच्या काळात शासनाची जबाबदारी केवळ टँकर पाठवणे किंवा मदतीची घोषणा करणे एवढीच मर्यादित असू शकत नाही. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य, जनावरांसाठी चारा छावण्या, शेतकऱ्यांच्या पिकांचे वस्तुनिष्ठ पंचनामे, योग्य नुकसानभरपाई, पीककर्ज पुनर्रचना, रोजगार हमीची कामे आणि स्थलांतर रोखण्यासाठी स्थानिक रोजगार या उपाययोजना वेळेत झाल्या पाहिजेत. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर प्रशासन जागे होण्याऐवजी दुष्काळाची चाहूल लागताच प्रतिबंधात्मक नियोजन सुरू झाले पाहिजे. गावनिहाय पाणीलेखा तयार करणे, उपलब्ध जलसाठ्याचे पारदर्शक वाटप करणे, भूजलपातळीचे नियमित निरीक्षण करणे आणि पाणी वापरावर शास्त्रीय नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.



जलसंधारणाच्या कामांची गुणवत्ता तपासली पाहिजे. केवळ कागदावर बंधारे बांधून किंवा छायाचित्रे प्रसिद्ध करून दुष्काळाशी लढता येणार नाही. प्रत्येक रुपयातून किती पाणी अडले आणि किती पाणी जमिनीत मुरले, याचे उत्तर प्रशासनाने द्यायला हवे.

माझी जबाबदारी काय आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधताना मी स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे. दुष्काळावर भाष्य करणे सोपे आहे; पण स्वतःच्या घरातील नळ बंद करणे, पाण्याचा अपव्यय थांबवणे आणि पाण्याचे नियोजन करणे ही खरी परीक्षा आहे. मी ब्रश करताना नळ उघडा ठेवतो का? वाहन धुण्यासाठी गरजेपेक्षा अधिक पाणी वापरतो का? घरातील गळणारे नळ दुरुस्त करतो का? पावसाचे पाणी साठवण्यासाठी प्रयत्न करतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे देणे म्हणजेच माझ्या जबाबदारीची पहिली पायरी. माझी जबाबदारी केवळ पाणी वाचवण्यापुरती नाही. घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी साठवणे, सोसायटीत रेनवॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था करणे, झाडांना आवश्यक तेवढेच पाणी देणे, शक्य तेथे ठिबक व तुषार सिंचनाचा वापर प्रोत्साहित करणे आणि स्थानिक जलस्रोत स्वच्छ ठेवणे हेही माझे कर्तव्य आहे. घरातील प्रत्येक सदस्याला, विशेषतः मुलांना, पाण्याचे महत्त्व समजावून सांगणे गरजेचे आहे. कारण पाणी वाचवण्याची संस्कृती एका दिवसाच्या मोहिमेतून नव्हे, तर दैनंदिन सवयींतून निर्माण होते.

शेतकरी केवळ अन्नदाता नाही, तर आपल्या जगण्याच्या व्यवस्थेचा आधार आहे. त्याच्या शेतातील पीक जळते, तेव्हा केवळ त्याचे आर्थिक नुकसान होत नाही; आपल्या ताटातील अन्नाच्या सुरक्षिततेवरही संकट येते. त्यामुळे दुष्काळात शेतकऱ्याला दोष देण्याऐवजी त्याच्या पाठीशी उभे राहणे ही माझी सामाजिक जबाबदारी आहे. स्थानिक शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे, अन्नाची नासाडी टाळणे, शेतकरी उत्पादक गटांना प्रोत्साहन देणे आणि संकटग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात देणे ही समाज म्हणून आपली भूमिका आहे. जनावरांची तहान आणि भूकही दुष्काळाच्या वेदनेचा भाग आहे. चारा-पाण्याअभावी मुक्या जनावरांची होणारी परवड अस्वस्थ करणारी आहे. पशुधनाचे संरक्षण, चारा बँक, वैरण लागवड आणि पशुवैद्यकीय सेवा यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. माणसाबरोबरच मुक्या जीवांनाही जगण्याचा अधिकार आहे, ही करुणेची जाणीव आपण विसरता कामा नये.

पाण्याचे प्रश्न पक्षीय राजकारणाच्या पलीकडे आहेत. गावातील विहीर, तलाव, नदी, नाला आणि धरण ही कोणत्याही एका वर्गाची किंवा पक्षाची मालमत्ता नाही, ती सार्वजनिक जीवनाची संपत्ती आहे. पाणीवाटपात पारदर्शकता, समन्यायी न्याय आणि स्थानिक लोकसहभाग आवश्यक आहे. पाण्यासाठी गावागावांत संघर्ष होण्यापेक्षा गावांनी एकत्र येऊन जलसंधारणाची लोकचळवळ उभी करणे अधिक महत्त्वाचे आहे. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार', जलयुक्त शिवार, शेततळी, समतल चर, नाला खोलीकरण, वृक्षलागवड आणि पाणलोट विकास अशा उपाययोजना स्थानिक गरजेनुसार आणि शास्त्रीय पद्धतीने राबविल्या पाहिजेत. मात्र कोणतीही योजना लोकसहभागाशिवाय टिकत नाही. ग्रामसभा, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालये, उद्योग आणि नागरिकांनी एकत्र येऊन गावाचा जलआराखडा तयार केला पाहिजे. प्रत्येक गावाने पाण्याचा हिशेब ठेवला, तर भविष्यातील संकटाची तीव्रता निश्चितच कमी करता येईल.

मला वाटते, दुष्काळ ही केवळ निसर्गाची परीक्षा नाही, ती माणसाच्या संवेदनशीलतेची, प्रशासनाच्या कार्यक्षमतेची आणि समाजाच्या सामूहिक विवेकाची परीक्षा आहे. आपण पाण्याची किंमत टंचाईच्या वेळीच ओळखणार आहोत का? टँकरसमोर रांग लागल्यावरच जलसंधारण आठवणार आहे का? विहीर आटल्यावरच भूजलाचा विचार करणार आहोत का? की संकट येण्यापूर्वीच सज्ज होणार आहोत? माझी जबाबदारी म्हणजे केवळ माझ्या घरातील पाणी वाचवणे नव्हे, तर पाण्याबाबत जबाबदार विचार समाजात रुजवणे, प्रशासनाला प्रश्न विचारणे, योग्य योजनांना सहकार्य करणे आणि निसर्गाशी संवेदनशील नाते निर्माण करणे. मी एकटा संपूर्ण महाराष्ट्राचा दुष्काळ संपवू शकणार नाही, पण माझ्या कृतीतून एका थेंबाचे मोल वाढवू शकतो, एका झाडाला जगवू शकतो, एका कुटुंबाला जागरूक करू शकतो आणि एका गावाला जलस्वयंपूर्णतेच्या दिशेने प्रेरित करू शकतो.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, दुष्काळ आभाळातून पडतो, पण त्याची तीव्रता आपल्या निष्काळजीपणातून वाढते. पाणी वाचवणे ही केवळ शासनाची योजना नाही, ती प्रत्येक नागरिकाची प्रतिज्ञा असली पाहिजे. कारण आज आपण पाण्याचा प्रत्येक थेंब जपला, तर उद्या आपल्या मुलांच्या डोळ्यांत पाण्यासाठी असहायतेचे अश्रू दिसणार नाहीत. दुष्काळावर मात करण्याची सुरुवात शासनाच्या आदेशाने नव्हे, तर माझ्या आणि तुमच्या जबाबदार कृतीने झाली पाहिजे! पाणी वाचवा, जीवन वाचवा, कारण पाणी असेल तरच उद्या असेल!

प्रवीण बागडे
साहित्यिक आणि सामाजिक विश्लेषक,
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करावे – जी. श्रीकांत यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर : भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, थोर समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञ महात्मा जोतीराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त सन २०२७ हे द्विशताब्दी वर्ष साजरे करण्यात येत आहे. या निमित्ताने महात्मा जोतीराव फुले यांचे सामाजिक समता, स्त्रीशिक्षण, शेतकरी कल्याण, सामाजिक न्याय आणि मानवमुक्तीविषयक विचार समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व शासकीय विभागांनी आपापल्या स्तरावर वर्षभर विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १० एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या शासन परिपत्रकानुसार, दि. ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या कालावधीत महात्मा जोतीराव फुले यांचे द्विशताब्दी वर्ष विविध उपक्रमांनी साजरे करण्यात येणार आहे. राज्य शासनाने यासाठी महिनानिहाय कृती आराखडाही निश्चित केला आहे. या आराखड्याच्या अनुषंगाने केवळ शैक्षणिक संस्थांपुरते कार्यक्रम मर्यादित न ठेवता सर्व विभागांनी आपल्या कार्यक्षेत्रात जनजागृतीपर उपक्रम राबवून या महापुरुषांचे विचार समाजाच्या घराघरात पोहोचवावेत, असे विभागीय आयुक्तांनी म्हटले आहे.

या उपक्रमांच्या प्रभावी प्रसिद्धीसाठी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा माहिती अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे. संबंधित विभागांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांची माहिती, छायाचित्रे आणि वृत्त जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसारित करावे. वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी, समाजमाध्यमे तसेच अन्य उपलब्ध प्रसिद्धी माध्यमांचा प्रभावी वापर करून महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याची व्यापक जनजागृती करावी, असेही आवाहन त्यांनी केले आहे.



राज्य शासनाच्या कृती आराखड्यानुसार जागृती रॅली, भित्तिपत्रक अभियान, जीवनपरिचय सप्ताह, जलसंवर्धन, शेतकरी व जलव्यवस्थापनविषयक उपक्रम, बालसभा आणि स्वच्छता अभियान; सामाजिक समता कथा, चर्चा, ग्रामभेट, समता भिंत आणि समता दौड; वृक्षारोपण, देशभक्तीपर गीत कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा, महात्मा फुले साहित्य वाचन अभियान ,शिक्षक गौरव, नवोपक्रम स्पर्धा, विज्ञान व माहिती-तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम; स्त्री सक्षमीकरण, भूमिका अभिनय, पोस्टर स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन आणि महात्मा फुले शैक्षणिक प्रेरणा सप्ताह, संविधानविषयक पुस्तकांचे वाचन, अभिरूप ग्रामपंचायत व जिल्हा परिषद उपक्रम, पोवाडा स्पर्धा,जनजागृती रॅली,सांस्कृतिक महोत्सव, चित्रकला स्पर्धा, संशोधन, स्थानिक इतिहासाचा अभ्यास, मुलाखती व प्रकल्प सादरीकरण; वादविवाद, निबंध, पोस्टरनिर्मिती आणि प्रकल्प सादरीकरण स्पर्धा; तर मार्चमध्ये समारोप कार्यक्रम, पुरस्कार वितरण, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी व शिक्षकांचा विशेष सन्मान,अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे.

या सर्व उपक्रमांमध्ये सामाजिक समता, स्त्रीशिक्षण, शिक्षणाचे महत्त्व, शेतकरी कल्याण, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या विचारांना प्राधान्य देण्यात यावे. विविध विभागांनी त्यांच्या कामकाजाच्या स्वरूपानुसार व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, प्रदर्शन, जनजागृती मोहिमा आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करावेत. तसेच शासनाच्या निर्देशानुसार कार्यक्रमांचे नियोजन करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली या आठही जिल्ह्यांतील सर्व शासकीय यंत्रणांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा. महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या कार्यातून दिलेला समता, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले आहे.

सण बदलले की माणसे बदलली ...?

माणसाचे जीवन म्हणजे सुख-दुःख, आशा-निराशा, यश-अपयश आणि संघर्ष यांचा अखंड प्रवास असतो. या प्रवासात कधी आनंदाचे क्षण येतात, तर कधी दुःखाचे सावट पसरते. रोजच्या धावपळीत माणूस आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना स्वतःसाठी जगणेच विसरून जातो. अशा वेळी सण आणि उत्सव त्याच्या जीवनात आनंदाची नवी पालवी घेऊन येतात. मनाला उभारी देतात, नात्यांना नवी ऊर्जा देतात आणि जगण्याला एक वेगळाच अर्थ प्राप्त करून देतात. म्हणूनच भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र एक प्रश्न मनात निर्माण होतो, तो म्हणजे आपण सण साजरे करतो म्हणून आनंदी होतो की आनंदी राहण्यासाठी सण साजरे करतो?

भारतीय संस्कृती ही विविधतेने नटलेली आहे. येथे प्रत्येक ऋतूचे, प्रत्येक परंपरेचे आणि प्रत्येक धार्मिक श्रद्धेचे वेगळे वैशिष्ट्य आहे. गुढीपाडवा, दिवाळी, दसरा, होळी, गणेशोत्सव, नवरात्र, मकरसंक्रांत, ईद, ख्रिसमस, बुद्ध पौर्णिमा, गुरुपर्व अशा अनेक सणांमधून भारतीय समाजाची सांस्कृतिक समृद्धी दिसून येते. प्रत्येक सणामागे काही ना काही सामाजिक, धार्मिक, ऐतिहासिक किंवा नैसर्गिक संदर्भ दडलेला असतो. या सणांचा मूळ उद्देश केवळ परंपरा जपणे एवढाच नसून माणसाला माणसाशी जोडणे हा आहे. परंतु काळाच्या ओघात सणांचे स्वरूप बदलत चालले आहे. पूर्वी सण म्हणजे एकत्र येण्याचा आनंद होता. आज अनेकदा सण म्हणजे खर्च, दिखावा आणि स्पर्धा असे समीकरण तयार होताना दिसते.

पूर्वीच्या काळी सणांची चाहूल लागली की घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण व्हायचे. घराची स्वच्छता, अंगणात रांगोळी, दाराला तोरण, नवीन कपडे, घरगुती फराळ आणि नातेवाईकांची ये-जा यामुळे संपूर्ण परिसर आनंदाने भरून जायचा. घरात फारशी आर्थिक सुबत्ता नसली तरी मनात समाधान असायचे. आईच्या हातच्या पदार्थांना वेगळीच चव असायची. आजी-आजोबांच्या गोष्टींमधून संस्कार मिळायचे. लहान मुले सणाची आतुरतेने वाट पाहायची. सण साजरा करण्यासाठी मोठ्या पैशांची आवश्यकता नव्हती. कारण त्या काळात आनंदाची किंमत पैशांत मोजली जात नव्हती. माणसांच्या सहवासातच खरा आनंद शोधला जात होता.

आज परिस्थिती बदलली आहे. आर्थिक प्रगती झाली, तंत्रज्ञान विकसित झाले आणि जीवनमान उंचावले. बाजारपेठा आकर्षक वस्तूंनी सजल्या. सणांच्या निमित्ताने मोठमोठ्या जाहिराती, सवलती आणि खरेदीच्या योजना सुरू झाल्या. सणांचा आनंद बाजारपेठेच्या आकर्षणात अडकू लागला. कोणाचे कपडे महागडे, कोणाची सजावट आकर्षक, कोणाचा उत्सव भव्य आणि कोणाचा खर्च अधिक, याची नकळत स्पर्धा सुरू झाली. सण साजरे करण्यापेक्षा त्यांचे प्रदर्शन करण्याला महत्त्व प्राप्त होऊ लागले. आनंद हा मनाचा विषय असताना आपण त्याला पैशांच्या तराजूत तोलण्याचा प्रयत्न करू लागलो. परिणामी सणांचे बाह्य स्वरूप अधिक झगमगीत झाले; पण अंतःकरणातील समाधान मात्र कमी होत चालले आहे.

सणांचा खरा आनंद हा वस्तूंमध्ये नसून माणसांमध्ये असतो. घरात किती दिवे लावले यापेक्षा आपल्या वागण्यामुळे किती माणसांच्या जीवनात प्रकाश निर्माण झाला, हे अधिक महत्त्वाचे आहे. आपण किती गोडधोड पदार्थ तयार केले यापेक्षा किती माणसांशी गोड बोललो, याला अधिक अर्थ आहे. नवीन कपडे परिधान करून आनंद व्यक्त करणे चुकीचे नाही; पण त्याच वेळी गरजू व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्य फुलवता आले तर त्या आनंदाला वेगळीच उंची प्राप्त होते. सण म्हणजे केवळ स्वतःच्या सुखाचा उत्सव नसून इतरांच्या जीवनात आनंद वाटण्याची संधी आहे. दुसऱ्याच्या आनंदात सहभागी होण्याची वृत्ती जिथे निर्माण होते, तिथेच सणांचे खरे सार्थक होते.

आजच्या काळात एक चिंताजनक बाब प्रकर्षाने जाणवते. माणसे एकमेकांशी संपर्कात आहेत; पण मनाने दूर जात आहेत. मोबाईल आणि सोशल मीडियामुळे शुभेच्छांचा वर्षाव होतो. शेकडो संदेश पाठवले जातात. आकर्षक छायाचित्रे आणि व्हिडिओ प्रसारित केले जातात. मात्र प्रत्यक्ष भेटून विचारपूस करण्यासाठी वेळ मिळत नाही. एकाच घरात राहणारी माणसेसुद्धा आपापल्या मोबाईलमध्ये गुंतलेली दिसतात. पूर्वी सणांच्या निमित्ताने नातेवाईकांच्या घरी जाणे, एकत्र बसून गप्पा मारणे, जुन्या आठवणींना उजाळा देणे आणि सुख-दुःखाची देवाणघेवाण करणे हीच खरी पर्वणी असायची. आता अनेकदा या भेटींची जागा डिजिटल शुभेच्छांनी घेतली आहे. तंत्रज्ञानाने अंतर कमी केले; पण माणसांच्या मनातील दुरावा कमी करण्यासाठी केवळ तंत्रज्ञान पुरेसे नाही.

सण-उत्सवांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सामाजिक एकात्मता. समाजात विविध जाती, धर्म, भाषा आणि आर्थिक स्तरांतील माणसे राहतात. या सर्वांना एकत्र आणण्याची ताकद सणांमध्ये आहे. सार्वजनिक उत्सवांच्या माध्यमातून परस्पर सहकार्य, बंधुभाव आणि सामूहिक जबाबदारीची भावना विकसित होऊ शकते. मात्र उत्सव साजरा करताना धार्मिक अहंकार, अनावश्यक स्पर्धा किंवा दुसऱ्याच्या भावना दुखावणारे वर्तन घडत असेल तर त्या उत्सवाचा मूळ उद्देशच हरवतो. आपला आनंद साजरा करताना इतरांना त्रास होणार नाही, याची काळजी घेणे हीसुद्धा सामाजिक जबाबदारी आहे. उत्सवाच्या नावाखाली होणारे ध्वनिप्रदूषण, पर्यावरणाची हानी आणि अनावश्यक उधळपट्टी यावरही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

सणांचा संबंध आपल्या निसर्गाशीही जोडलेला आहे. अनेक सण ऋतूंच्या बदलाशी, शेतीशी आणि निसर्गचक्राशी संबंधित आहेत. मकरसंक्रांत, बैलपोळा, नागपंचमी यांसारख्या सणांमधून निसर्ग आणि मानवी जीवनातील परस्परावलंबित्व अधोरेखित होते. निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हा या परंपरांमधील महत्त्वाचा संदेश आहे. मात्र आज उत्सवांच्या निमित्ताने पर्यावरणाचे नुकसान होत असेल तर आपण आपल्या परंपरांचा खरा अर्थ समजून घेतलेला नाही, असेच म्हणावे लागेल. आनंद साजरा करताना निसर्गाचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

सण-उत्सवांचा विचार करताना समाजातील आर्थिक विषमतेकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. एका बाजूला काही घरांत सणांच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो, तर दुसऱ्या बाजूला अनेक कुटुंबांना दैनंदिन गरजा भागवतानाही संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत सणांचा आनंद सर्वांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येक संवेदनशील व्यक्तीची आहे. एखाद्या गरजू विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य देणे, वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत वेळ घालवणे, एकाकी व्यक्तीची विचारपूस करणे किंवा अडचणीत असलेल्या कुटुंबाला मदतीचा हात देणे, हीदेखील सण साजरा करण्याची सुंदर पद्धत ठरू शकते. कारण आनंद वाटल्याने कमी होत नाही, उलट तो अधिक वाढतो.

लहान मुलांच्या दृष्टीने सण-उत्सव हे आनंदाबरोबरच संस्कारांचे महत्त्वाचे माध्यम आहेत. मुलांना सणांचा इतिहास, त्यामागील विचार आणि सामाजिक संदेश समजावून सांगणे आवश्यक आहे. केवळ नवीन कपडे, मिठाई आणि सुट्ट्या एवढ्यापुरताच सणांचा अर्थ मर्यादित राहू नये. सणांच्या माध्यमातून मुलांमध्ये स्वच्छता, सहकार्य, कृतज्ञता, परस्पर आदर, पर्यावरणप्रेम आणि सामाजिक बांधिलकी यांसारखी मूल्ये रुजवता येतात. शाळा आणि कुटुंब यांनी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. कारण आजच्या मुलांच्या मनात रुजवलेले संस्कारच उद्याच्या समाजाचे स्वरूप निश्चित करणार आहेत.

खरे पाहता आनंद ही बाहेरून मिळवण्याची वस्तू नाही. तो आपल्या विचारांत, वागण्यात आणि समाधान मानण्याच्या वृत्तीत दडलेला असतो. सण हा आनंद निर्माण करण्याचा एक प्रसंग असतो; पण आनंदी राहण्यासाठी प्रत्येक वेळी सणाचीच वाट पाहण्याची गरज नाही. रोजच्या जीवनातील छोट्या छोट्या गोष्टींमधूनही आनंद मिळू शकतो. सकाळचा सुंदर सूर्योदय, आई-वडिलांचे आशीर्वाद, मुलांचे निरागस हास्य, मित्रांची भेट, एखाद्याला केलेली मदत किंवा दिवसभराच्या कष्टानंतर मिळणारे समाधान, हे सारे आनंदाचेच क्षण आहेत. अशा क्षणांचा आस्वाद घेता आला तर प्रत्येक दिवस उत्सवासारखा वाटू शकतो.

आज गरज आहे ती सणांच्या मूळ उद्देशाकडे पुन्हा वळण्याची. सण साजरे करताना खर्चापेक्षा समाधानाला, दिखाव्यापेक्षा साधेपणाला आणि स्पर्धेपेक्षा सहकार्याला महत्त्व दिले पाहिजे. आपले घर सजवताना मनातील कटुता दूर केली पाहिजे. दिवे लावताना विचारांतील अंधार दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गोडधोड खाताना नात्यांमधील गोडवा जपला पाहिजे. देवाची पूजा करताना माणसातील माणुसकीचाही सन्मान केला पाहिजे. कारण सणांचे खरे सौंदर्य त्यांच्या भव्यतेत नसून त्यातून निर्माण होणाऱ्या सद्भावनेत आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, सण हे आनंदाचे निमित्त असावे, प्रदर्शनाचे साधन नव्हे. उत्सव हा माणसांना जोडणारा असावा, तोडणारा नव्हे. आपल्या आनंदात इतरांना सामावून घेता आले, मनातील अहंकार कमी करता आला आणि नात्यांमधील प्रेम जपता आले तर प्रत्येक सण खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल. सण संपल्यानंतरही माणसांच्या मनात प्रेम, समाधान आणि आपुलकी शिल्लक राहिली पाहिजे. कारण सजावट उतरवली जाते, रोषणाई विझते, उत्सवाचा गजर थांबतो; पण माणुसकीच्या नात्यांतून निर्माण झालेला आनंद दीर्घकाळ टिकून राहतो.

सण वर्षातून काही दिवस येतात; पण आनंद आणि माणुसकी जपली तर आयुष्यातील प्रत्येक दिवस सण होऊ शकतो. हाच सण-उत्सवांचा खरा अर्थ आणि मानवी जीवनातील सर्वांत सुंदर संदेश आहे. दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा .....!

लेखन : नासा येवतीकर
nasayeotikar26@gmail.com

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर
बुधवार, दि. ०४ नोव्हेंबर २०२६

शेखर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप



उरण दि ३( ) शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस ॲड शेखर पाटील यांचा यांच्या वाढदिवसानिमित्त उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद पिरकोन शाळा येथे वह्या वाटप खाऊ वाटप व शाळेला पंखा भेट देण्यात आले.यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका नीलिमा मॅडम यांनी वाढदिवसानिमित्त औक्षण केले.प्रास्ताविकात जेएनपीटीचे शाळेचे प्राचार्य गिरीश पाटील यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. मुख्य अतिथी सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे अध्यक्ष विलास गावंड यांनी शेखर पाटील यांच्या कार्याचा गौरव करून समाजाची सेवा करण्यासाठी शतायुषी व्हा अशी प्रार्थना केली. यावेळी शेखर पाटील आपल्या भाषणात म्हणाले माझ्या गावाने वाढदिवसानिमित्त माझा सत्कार केलेला आहे त्याबद्दल मी आपला ऋणी आहे समाजाचे सेवा करण्याचे व्रत कायम जोपासले जाईल.यावेळी सामाजिक संस्थेचे विभाग प्रमुख दिलीप पाटील, ग्रामपंचायत सदस्य अंकित पाटील, ग्रामपंचायत सदस्य निखिल गावंड,पिरकोन अध्यापक विद्यालयाचे व्हाईस चेअरमन आनंत गावंड मुख्याध्यापका नीलिमा म्हात्रे, सहशिक्षिका ज्योती बामणकर, स्कूल कमिटीचे अध्यक्षा आयुश्या गावंड, ग्रामस्थ व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

अक्का महाराज यांच्या हस्ते आडगाव येथे श्री राधा कृष्ण मंदिर मध्ये महाआरती संपन्न



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी : आडगाव तालुका जिल्हा छत्रपती संभाजी नगर यांच्यावतीने या परिसरातील वैभव म्हणून ओळख असलेले श्री राधा कृष्ण मंदिर या ठिकाणी सकाळी दिंडी फेरी व महाआरती चे गावकऱ्यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते श्री क्षेत्र वेरूळ येथील नाथ आश्रम प्रमुख गुरुवर्य अक्का महाराज .संतोष करपे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली या प्रसंगी भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थित होती या प्रसंगी राधाकृष्ण मंदिर येथील गुरुवर्य स्वामी विनायक जी महाराज बाबासाहेब ठोंबरे अमरीश बोराडे सुदर्शन पोफळे चंद्रकांत कुबेर

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व स्वयम् योजनेच्या प्रवेश अर्जासाठी मुदतवाढ

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेच्या प्रवेश अर्जासाठी 13 नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ऑफलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज सादर करण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच, परभणी जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयांमध्ये व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम् योजनेसाठी विहित मुदतीत अर्ज सादर करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

अनुदानावर डल्ला; जिंतूरमध्ये तलाठी-मध्यस्थांचे रॅकेट उघडकीस!

मृत, स्थलांतरित व अनुदानाची माहिती नसलेल्या शेतकऱ्यांच्या नावावर लाखोंची उचल



जिंतूर : शासनाकडून अतिवृष्टी आणि दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या रकमेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार जिंतूर तालुक्यात समोर आला आहे. मृत शेतकरी, बाहेरगावी स्थलांतरित झालेले तसेच अनुदान मिळाल्याची माहितीही नसलेल्या शेतकऱ्यांच्या नावावर लाखो रुपयांची अनुदान रक्कम परस्पर उचलल्याचे गंभीर आरोप होत आहेत. विशेषतः तलाठी आणि मध्यस्थांच्या संगनमतातून हा प्रकार घडल्याचा संशय व्यक्त होत असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

तालुक्यातील केहाळ येथून या प्रकाराला सुरुवात झाली. गावातील सरपंच आणि ग्रामस्थांनी हा प्रकार तहसीलदार शीतल कच्छवे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर प्रशासनाने चौकशी सुरू केली आहे. मागील दहा वर्षांपासून संबंधित तलाठी सज्जामध्ये कार्यरत असलेल्या तलाठ्यांच्या तसेच त्यांच्या सहाय्यकांच्या कार्यकाळातील व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. काही शेतकऱ्यांच्या नावात बदल झाल्याचे कारण सांगून राजपत्रात नाव प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया राबविण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या प्रकरणात तलाठी सहाय्यक सीताराम सानप यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तत्कालीन तलाठी एम.एम. लंगुळे, केदार कुलकर्णी, राठोड, विकास आगलावे तसेच सध्या कार्यरत भुसेवाड यांच्या कार्यकाळातील व्यवहारांचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे.

येलदरी जिल्हा मध्यवर्ती बँक आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून हा प्रकार केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. यामध्ये सावंगी माळसा, सावळी बुद्रुक, माणकेश्वर, हिवरखेडा, घडोळी, शेवडी, येनोली, गणेशनगर आदी गावांमध्येही अशाच प्रकारचे गैरव्यवहार झाल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, सीताराम सानप यांच्या विरोधात नागरिकांकडून विविध कामांसाठी लाखो रुपये उकळल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या आहेत. जमिनीच्या फेरफारासह इतर महसुली कामांसाठी तलाठ्यांच्या नावाचा आधार घेत पैसे वसूल केल्याचे आरोप आहेत. त्यामुळे हा प्रकार केवळ एका गावापुरता मर्यादित नसून संपूर्ण तालुक्यातील अनुदान वितरणाची तपासणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

सरपंचांची सखोल चौकशीची मागणी

केहाळ येथील संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर तातडीने गुन्हे दाखल करावेत. सर्व संबंधित तलाठ्यांच्या कार्यकाळातील अनुदान वितरणाची तपासणी करावी आणि अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी सरपंच गंगूबाई सदाशिव घाडगे यांनी केली आहे.

तहसीलदारांचे चौकशीचे आश्वासन

या प्रकरणासंदर्भात तहसीलदार शीतल कच्छवे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता, त्यांनी माध्यमांच्या प्रश्नांवर प्रतिक्रिया दिली नाही. मात्र, शिष्टमंडळाला या प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिल्याचे तक्रारदारांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या हक्काच्या अनुदानावरच डल्ला मारला जात असेल, तर ही केवळ आर्थिक अनियमितता नसून शेतकऱ्यांच्या विश्वासाला तडा देणारी गंभीर बाब आहे. त्यामुळे चौकशी केवळ कागदोपत्री न राहता दोषींवर कठोर कारवाई होणे आणि पात्र शेतकऱ्यांना त्यांचे हक्काचे अनुदान मिळणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांनी रब्बी हंगामासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी व्हावे : कृषी विभाग

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : राज्यात यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता, शेतकऱ्यांनी पीक नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळविण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. रब्बी हंगामातील पिकांचा विमा उतरवून संभाव्य नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक सुरक्षितता मिळवावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

परभणी जिल्ह्यासाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ही विमा कंपनी नियुक्त करण्यात आली असून, जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पिकासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पिकांच्या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्यासाठी राज्य शासनामार्फत सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम 2026 आणि रब्बी 2026-27 या वर्षासाठी अधिसूचित क्षेत्रातील पिकांसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. रब्बी हंगामामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होऊन पिक विमा उतरवावा. रब्बी हंगामामध्ये गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा, रब्बी मका, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग आणि रब्बी कांदा या सात पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे. अधिसूचित महसूल मंडळ किंवा क्षेत्रातील शेतकऱ्यांना विमा योजनेत सहभागी होता येणार आहे.

शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्यासाठी रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) 30 नोव्हेंबर, गहू (बागायत), हरभरा, रब्बी मका आणि रब्बी कांदा पिकांसाठी 15 डिसेंबर तर उन्हाळी भात आणि उन्हाळी भुईमूग 31 मार्च 2027पर्यंत विमा काढता येणार आहे. या योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होणे ऐच्छिक आहे. योजनेच्या नोंदणीसाठी PMFBY पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.

कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेमार्फत विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. मात्र, योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी संबंधित बँकेला लेखी स्वरुपात कळविणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या https://pmfby.gov.in या अधिकृत पोर्टलवर स्वतः नोंदणी करावी किंवा बँक, विमा कंपनीने नियुक्त केलेले एजंट, क्रॉप इन्शुरन्स ॲप तसेच सामूहिक सेवा केंद्र यांच्या माध्यमातून योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन कृषि विभागाकडून करण्यात आले आहे.

परभणी जिल्ह्यासाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ही विमा कंपनी नियुक्त करण्यात आली असून, क्षेत्रीय कार्यालय, दुसरा मजला, काकडे बीझ, आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ, गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे – ४११०१६, (ई-मेल pmfby2026@uiic.co.in) या पत्त्यावर संपर्क साधता येणार आहे. योजनेच्या अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, जिल्हाधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुख्यालयीन न राहणाऱ्यां शिक्षकावर जि प प्रशासनाने कारवाई करा : आ प्रशांत बंब

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



खुलताबाद प्रतिनिधी (संतोष करपे) खुलताबाद व गंगापूर तालुक्यातील मुख्यालय वास्तव्यस न राहणाऱ्या शिक्षकावर शासकीय परिपत्रकानुसार जि प प्रशासनाने कठोर प्रशासकीय कारवाई करावी आणि ज्या शिक्षकांनी मुख्यालय राहण्याचे खोटे पुरावे सादर करून घेतलेल्या घरभाडे भत्त्याची (एच आर ए) वसुली करावी अशी मागणी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाची आमदार प्रशांत बंब यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे 30 ऑक्टोबर रोजी जिल्हा प्रशासनाला स्मरण पत्र दिले आहे

यापूर्वी संबंधित शिक्षकांचे तीन वर्षासाठी तात्पुरती वार्षिक वेतन वाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली होती, मात्र त्या नंतर ही शिक्षक हे मुख्यालयी राहत नसल्याचा आरोप आमदार प्रशांत बंब यांनी केला आहे मुख्यालय राहण्याचा विषय विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेशी जोडलेला असून गेल्या अनेक दिवसापासून या वर आ बंब हे प्रशासनाकडे पाठपुरावा न या विषयावर शिक्षक मुख्यालय न राहिल्यामुळे विद्यार्थ्यांचे कशाप्रकारे नुकसान होते हे महाराष्ट्र विधिमंडळाच्या सभागृहात पोट तिडकीने मांडून सभागृहाचे लक्ष वेधले होते

त्यानुसार जि.प. जि प प्रशासनाचा वेतन वाढीवर कारवाई होऊनही संबंधित शिक्षकांमध्ये सुधारणा न झाल्यास पुढील कठोर पावले उचलावी तसेच या प्रकरणात आतापर्यंत करण्यात आलेल्या व पुढील कारवाईची प्रत तीन दिवसाच्या उपलब्ध करून द्यावी , व कारवाई न केल्यास त्याचे कारणे स्पष्ट करावे अशी मागणी आमदार प्रशांत बंब यांनी जि.प.प्रशासनाकडे केली आहे.

अखिला मेमोरियल ट्रस्टच्या वतीने रानसई मार्गाचीवाडी व सागाचीवाडीवरील आदिवासी बांधवांना दिवाळी निमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



उरण दि ३(विठ्ठल ममताबादे)प्रत्येक माणसाच्या जीवनात जसा आनंद हा काही काळापुरता क्षणभंगूर वेळेचा सोबती असतो तसंच दुःख सुद्धा चिरकाल टिकणारं नसतं. फक्त त्या दुःखावर मात करत त्यातून सुद्धा आनंद कसा शोधता येईल याची कला अवगत असणं खूप महत्वाचं आहे. अश्याच एका हृदयपिळवटून टाकणाऱ्या घटनेत अगदी लहान वयातच कॅन्सर सारख्या आजारात आपली लाडकी मुलगी अखिला हिला गमावलेल्या,आपला काळजाचा तुकडा हरपलेल्या त्या संपूर्ण बाळा सुब्रमण्यम आणि कलावतीजी सुब्रमण्यम यांच्या कुटुंबावर दुःखाचं आभाळ कोसळलं पण त्या दुःखाला कुरवाळत न बसता त्यातून सावरत आपल्या लाडक्या मुलीच्या अखिलादीदीच्या पवित्र स्मृतीतुन आठवणींचा सुगंध सामाजिक कार्याच्या माध्यमातून सदैव दरवळत राहावा म्हणून बाळा सुब्रमण्यम आणि कलावतीजी सुब्रमण्यम या उभयतांनी अखिला मेमोरियल ट्रस्ट या सेवाभावी संस्थेची स्थापना करून समाजातील गरीब गरजूवंत कॅन्सर पिडीत रूग्णांना मदतीचा हात पुढे करत त्यांची सेवाकरण्याचं पुण्यकर्माचं कार्य सुरू ठेवलं. त्याचसोबत समाजातील गरीब - गरजूवंत,आदिवासीं वाड्यांवस्तीवरील आदिवास बांधवांना अन्नधान्य कपडे, शालेय साहित्य,औषधं अश्या विविध प्रकारचे सामानरूपी मदत देऊन हे अनमोल असं सत्कार्य अविरतपणे सुरू ठेवत याच पुण्यकर्मातून आपल्या लाडक्या मुलीच अखिलादीदीच पुण्यस्मरण व्हावं ! आणि स्वर्गीय अखिलादीदी यांच्या स्मृतींना उजाळा मिळावा म्हणून त्यांच्या वडिलांनी स्थापन केलेल्या अखिला मेमोरियल ट्रस्टचे संस्थापक बाळासुब्रमण्यम, आणि कलावतीजी सुब्रमण्यम या उभयतांच्या औदार्यातून आणि केअर ऑफ़ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर,संपेशजी पाटील यांच्या विशेष अश्या सहकार्यरूपी पुढाकारातून उरण तालुक्यातील रानसई मार्गाचीवाडी आणि सागाचीवाडी या दोन आदिवासी वाड्यांवरील गरीब गरजूवंत आदिवासी बांधवांची दिवाळी गोड व्हावी म्हणून अगदी चांगल्या दर्जाचे रवा,मैदा, साखर,गोडेतेल,बेसन अश्या प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटत करण्यात आलं. सोबतच दिवाळी सणात दीपोत्सव साजरा करण्यासाठी सुंदर सुबक प्रकारच्या पणत्या देखील वाटप करण्यात आल्या.

स्वर्गीय कुमारी आखिलादीदी यांचे आई - बाबा बाळा सुब्रमण्यम,आणि कलावतीजी सुब्रमण्यम यांच्या कुटुंबियांच्या औदार्यातून आणि राजू मुंबईकर आणि संपेश पाटील यांच्या सहकार्यानं साकार झालेल्या ह्या आदर्शवत कार्यक्रमात आखिला मेमोरियल ट्रस्ट या संस्थेच्या वतीने ह्या आदिवासी बांधवांना दिवाळी भेट म्हणुन मिळालेलं जीवनावश्यक सामान व स्वतःच्या हाताने रंगकाम केलेल्या सुंदर पणत्या मिळाल्या वर त्या आदिवासीं भगिनींच्या आणि चिमुकल्या आदिवासी रानपाखरांच्या चेहऱ्यावरचा तो ओसंडून वाहणारा आनंद पाहण्या जोगा होता. ह्या आदिवासी बांधवांना दिवाळीच्या पूर्व संधेला मिळालेलं हे दिवाळी गोड करणारं साखर, रवा,मैदा, गोडेतेल,बेसन हे जीवनावश्यक वस्तूंचे समान आणि दीपोत्सव साजरा करण्यासाठी मिळालेल्या सुंदर सुबक पणत्या हे सर्व घेत असताना भावभरल्या मनाने दिलेले आशीर्वाद नक्कीच स्वर्गीय आखिला दीदीच्या संपूर्ण कुटुंबियांकरिता पुण्यफळ देणारं ठरेल आणि स्व.अखिला दीदीच्या स्मृतीनां निरंतर उजाळा देत राहील एवढ मात्र नक्की !

स्व.अखिलादीदी यांच्या पुण्यस्मरण दिनी अखिला मेमोरियल ट्रस्ट च्या माध्यामातून साकारलेल्या ह्या प्रेरणादायी कार्यक्रमा करीता प्रमुख उपस्थिती दर्शविली ती अखिला मेमोरियल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष बाळा सुब्रमण्यम,कलावतीजी सुब्रमण्यम, केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर,रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुका तसेच मुंबई शहरात सुद्धा आपल्या समाज कार्याचं सामाजिक दायित्व जपणारे सामाजिक कार्यकर्ते नारायणजी माने (सचिव - कुरचुंब विकास मंडळ मुंबई),रानसई ग्रामपंचायतीच्या सरपंच राधाताई पारधी, केळवणे गावचे सामाजिक कार्यकर्ते विलासभाऊ ठाकूर, वेश्वी गावचे सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्रदादा पाटील,अनिल घरत (लायन ग्रुप महाराष्ट्र सोशल मि.रायगड जिल्हा अध्यक्ष), सारडे गावचे सामाजिक संपेशजी पाटील,रानसई खोंड्याचीवाडीचे सामाजिक कार्यकर्ते शाम लेंडे सोबतच रानसई मार्गाचीवाडी आणि सागाचीवाडी या दोन आदिवासी वाड्यांवरील आदिवासीं बांधव व महीलां-भगिनीं आणि चिमुकल्यांच्या उपस्थित रानसई प्राथमिक शाळे जवळील भव्य अशा समाजहॉल मध्ये हा अनोखा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भावभरल्या वातावरणात संपन्न झाला.

नगरसेवक अशोक दामले यांच्या हस्ते रामदास वाघमारे यांचा सन्मान



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी : सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत नगरसेवक अशोकजी दामले यांनी समाजभूषण रामदास वाघमारे यांना भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची प्रत भेट देऊन सन्मानित केले.

यावेळी वाघमारे यांनी बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेल्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची तसेच माई वृद्धाश्रमातील निराधार ज्येष्ठ महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या सेवाकार्याची माहिती दिली. ज्येष्ठ महिलांना निवारा, भोजन आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचे दामले यांनी कौतुक केले.

समाजातील अनाथ निराधार वंचित घटकांसाठी सुरू असलेल्या माई वृद्धाश्रमाची दखल घेत त्यांनी वाघमारे यांना संविधानाच्या उद्देशिकेची प्रत भेट दिली. तसेच रामदास वाघमारे यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याविषयी नगरसेवक अशोक दामले यांनी भरभरून कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

कुमारी दीक्षा सुरडकर हिची लघुलेखक म्हणून नियुक्ती

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.३ नोंव्हेंबर

कुमारी दीक्षा आनंदा सुरडकर ही माहे डिसेंबर २०२४ मध्ये जिल्हा व सत्र न्यायालय जळगाव येथे कनिष्ठ लिपिक म्हणून रुजू झाली होती. त्यानंतर माहे ऑक्टोबर २०२६ मध्ये जिल्हा व सत्र न्यायालय,जळगाव कार्यालयामार्फत लघुलेखक पदासाठी अंतर्गत परीक्षा घेण्यात आली होती. त्यात दीक्षा येणे जिद्दीने व चिकाटीने अभ्यास करून सदर परीक्षा उत्तीर्ण केली. त्यानंतर तिची लघुलेखक ग्रेड- ३ या पदावर निवड करून तिला दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर जामनेर येथे दि.२/११/२०२६ पासून पदस्थापना देण्यात आली आहे.

तिचे जिल्हा व सत्र न्यायालय जळगाव येथील सर्व कर्मचाऱ्यांनी तसेच सिल्लोड व सोयगाव येथील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.कुमारी दीक्षा सुरडकर ही सोयगाव न्यायालयातील सहाय्यक अधीक्षक आनंद सुरडकर यांची कन्या आहे.

डॉ. मोहम्मद आमिर शेख यांची आय टी विभागप्रमुखपदी पदोन्नती



उरण दि ३(विठ्ठल ममताबादे) रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्याचे सुपुत्र डॉ. मोहम्मद आमिर शेख यांची पिल्लई एचओसी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुखपदी (एचओडी) पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या यशामुळे उरण परिसरासह शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

डॉ. मोहम्मद आमिर शेख यांनी या पदोन्नतीबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. वासुदेवन पिल्लई सर, प्राचार्य डॉ. जगदीश डब्लू. बाकल सर आणि फ्रनव पिल्लई सर यांचे मनःपूर्वक आभार मानले. या मान्यवरांनी दाखविलेला विश्वास, दिलेले प्रोत्साहन आणि सातत्यपूर्ण सहकार्य याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

विभागप्रमुख म्हणून नवीन जबाबदारी स्वीकारताना विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आधुनिक बदलांशी त्यांना अवगत करणे तसेच संशोधन, नवोपक्रम आणि शैक्षणिक प्रगतीला चालना देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार डॉ. शेख यांनी व्यक्त केला. त्यांच्या या पदोन्नतीमुळे उरण, रायगड परिसराच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या यशाबद्दल विविध स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्वत्र अभिनंदन होत आहे.

स्व. बाबुरावजी काळे महाविद्यालयास तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीर



बंकट स्वामी महाविद्यालय बीड येथे संपन्न झालेल्या विद्यापीठ स्तरीय अंतर महाविद्यालयीन तायक्वांदो क्रीडा स्पर्धेमध्ये अजिंठा येथील स्व. बाबुरावजी काळे महाविद्यालयाचा बीएससी प्रथम वर्षाचा विद्यार्थी सतीश क्षीरसागर याने स्वर्ण पदक पटकावले. दिनांक 31 ऑक्टोंबर ते 1 नोव्हेंबर 2026 दरम्यान बीड येथील बंकट स्वामी महाविद्यालयात विद्यापीठ स्तरीय तायक्वांदो स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये स्व. बाबुरावजी काळे महाविद्यालय अजिंठा येथील बी.एस्सी प्रथम वर्षाचा खेळाडू सतीश क्षिरसागर याने सहभाग घेतला होता. त्याने 54 किलो वजनी गटात तीन फेऱ्यांमध्ये विजय प्राप्त करून अंतिम फेरीत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. त्याच्या या मेहनतीचे व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल देसाई यांच्या मार्गदर्शनाचे अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. रंगनाथ नाना काळे, सचिव मा. प्रकाश दादा काळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी वाघमारे, उपप्राचार्य डॉ. गणेश वाघ, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

चंद्रभागाबाई बांबर्डे निधन



खुलताबाद प्रतिनिधी चंद्रभागाबाई रामभाऊ बांबर्डे (वय वर्ष ८२) यांचे आज पिंपरी सताळा तालुका फुलंब्री राहत्या घरी सायं.५ ३० वाजेच्या सुमारास वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले असून त्यांच्यावर उद्या दि ४/११/२०२६ बुधवार रोजी सकाळी १०.०० वाजता पिंपरी (सताळा) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात शंकर बांबर्डे यांच्या त्या आई होत्या ह भ प नारायण बांबर्डे यांच्या त्या चुलती होत्या. दोन मुले दोन मुली नातू असा परिवार आहे .

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

डिजिटल इंडियात फर्दापूरच्या एचपी HP पेट्रोल पंपवर फोन पे बंद पर्यटकांची हेळसांड अन् पंप मालकाच्या कारभारावर संतप्त सवाल

फर्दापूर प्रतिनिधी : केंद्र सरकारचा एकच नारा आहे देश डिजिटल करा प्रत्येक व्यवहार ऑनलाइन करा आणि नागरिकांना खिशात कॅश रोकड बाळगण्याची गरज भासू नये म्हणून कॅशलेस इंडिया'ला प्रोत्साहन द्या मात्र देशात एकीकडे डिजिटल क्रांतीचा डंका वाजवला जात असताना फर्दापूर येथील एचपी HP पेट्रोल पंप चालकाने मात्र चक्क शासनाच्या या धोरणाला केराची टोपली दाखवत पेट्रोल पंपवर फोन पे बंद आहे' असा फलक लावून थेट मनमानीचा कळस गाठला आहे या अजब आणि संशयास्पद कारभारामुळे हा एचपी पेट्रोल पंप चालवणारा मालक नेमका कोणाच्या इशाऱ्यावर चालतोय आणि हा मोदी सरकारच्या डिजिटल धोरणाला विरोध करतोय काअसा संतप्त सवाल आता नागरिकांमधून विचारला जात आहे

दूरवरून आलेल्या पर्यटकांची होतेय भयानक हेळसांड

फर्दापूर हे जागतिक पातळीवरील पर्यटन स्थळ असल्यामुळे येथे देश विदेशातून आणि महाराष्ट्राच्या विविध भागातून हजारो पर्यटक व वाहनचालक नेहमी येत असतात आजच्या काळात कोणाच्याही खिशात रोख पैसे नसतात सर्वजण मोबाईलवरून फोन पे 'गुगल पे किंवा स्कॅनरद्वारे युपीआय UPI पेमेंट करतात

मात्र जेव्हा एखादा बाहेरील पर्यटक किंवा वाहनचालक फर्दापूरच्या या एचपी HP पेट्रोल



पंप वर गाडीत पेट्रोल किंवा डिझेल भरण्यासाठी येतो तेव्हा त्याला आमच्याकडे ऑनलाइन पेमेंट चालत नाही रोख पैसे आणा" असे सांगून अपमानित केले जाते खिशात कॅश नसली आणि ऑनलाइन सुविधा बंद असल्यामुळे त्या पर्यटकांवर गाडी अक्षरश ढकलत नेण्याची किंवा रस्त्यावर हात पसरून कुणाकडे मदतीची भीक मागण्याची वेळ येते एका राष्ट्रीय स्तरावरील आणि वर्दळीच्या मार्गावरील या पेट्रोल पंपवर जर असा सावकारी थाटाचा कारभार चालत असेल तर पर्यटकांमध्ये फर्दापूरची किती वाईट प्रतिमा जात असेल याचा विचार न केलेले बरे

पंप चालकाचा हा प्रताप मोदी सरकारच्या विरोधात आहे का

आज सर्वसामान्य जनता चहाच्या टपरीपासून ते मोठ्या मॉल्सपर्यंत सर्वत्र ऑनलाइन पेमेंट करत असतानापेट्रोल पंपसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी फोन पे बंद'चा बडगा उगारणे अत्यंत संशयास्पद आहे ग्राहकांची आणि प्रवाशांची ही जाणीवपूर्वक चालवली गेलेली आर्थिक पिळवणूक आणि छळवणूकच आहे

जर या एचपी HP पेट्रोल पंप चालकाला डिजिटल पद्धतीने व्यवहार करणे मान्य नसेल तर त्यांनी शासनमान्य परवाना कशासाठी घेतला आहे हा थेटपणे देशाच्या आणि मोदी सरकारच्या डिजिटल इंडिया मोहिमेला हरताळ फासण्याचा प्रकार नाही का असा रोखठोक सवाल जनता विचारत आहे या उद्धट आणि ग्राहकांना वेठीस धरणाऱ्या पेट्रोल पंप चालकावर आणि संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांवर प्रशासनाने तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी अन्यथा तीव्र संताप व्यक्त होत आहे

दुष्काळी परिस्थितीचा आ. अनुराधाताई चव्हाण यांच्याकडून आढावा

पाणी, चारा टंचाईवर तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : फुलंब्री विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी तसेच पशुधन वाचविण्यासाठी शासनाच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, यासाठी आमदार सौ. अनुराधाताई अतुल चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. २) पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर येथे आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत मतदारसंघातील सर्व गावांमधील परिस्थितीचा गावनिहाय आढावा घेण्यात आला.

बैठकीत पाणीटंचाई, चारा उपलब्धता, पशुधनाचे संरक्षण, दुष्काळी परिस्थितीवरील तातडीच्या उपाययोजना तसेच विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीस सभापती कल्याण केशवराव गायकवाड, उपसभापती बाळासाहेब वाल्मिक गाढे, जिल्हा परिषद बांधकाम सभापती सचिन गरड, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अशोक जिजा पवार, जिल्हा परिषद सदस्य साधना रविंद्र कुलकर्णी,



ज्योती सुधाकर शिंदे, पंचायत समिती सदस्य पूजा नवनाथ घोडके, गयाबाई शंकरराव ठोंबरे, गीताबाई कोरडे, चंद्रशेखर दांडगे, निर्मला पळसकर, सुमन चव्हाण, सर्जेराव चव्हाण, सुनंदा आडसुळे, दत्तात्रय वर्षे, रत्नमाला ढमढेरे, चारुशिला गावंडे, शैलेश चौधरी यांच्यासह सरपंच, प्रशासक व पदाधिकारी उपस्थित होते.

प्रशासकीय स्तरावर तहसीलदार शिवानंद बीडवे, गटविकास अधिकारी शिवाजी साळुंके, विविध विभागांचे खातेप्रमुख, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्राममहसूल अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

एमडी परीक्षेत डॉ. ऋषिकेश देशमुख महाराष्ट्रात प्रथम

74 टक्के गुणांसह सुवर्णपदकावर मोहोर; घाटीच्या शिरपेचात मानाचा तुरा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (घाटी) वार्धक्यचिकित्साशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. ऋषिकेश अनिल देशमुख यांनी एमडी अंतिम परीक्षेत ७४ टक्के गुण मिळवत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला. या यशाबद्दल ते सुवर्णपदकाचे मानकरी ठरले आहेत.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पदव्युत्तर वैद्यकीय परीक्षेत डॉ. देशमुख यांनी वार्धक्यचिकित्साशास्त्र शाखेत अव्वल स्थान मिळविले. विभागप्रमुख डॉ. शैलजा राव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.



सातत्यपूर्ण अभ्यास, चिकित्सक दृष्टिकोन, रुग्णसेवेप्रती निष्ठा आणि परिश्रमाच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले.

शैक्षणिक यशासोबतच डॉ. देशमुख यांनी निवासी डॉक्टरांच्या संघटनात्मक कार्यातही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांची नुकतीच महाराष्ट्र वरिष्ठ निवासी डॉक्टर संघटनेच्या विद्यापीठ सचिवपदी निवड झाली. यापूर्वी त्यांनी मार्डच्या घाटी शाखेचे अध्यक्षपद आणि महाराष्ट्र राज्य मार्डचे सरचिटणीसपद भूषविले आहे. निवासी डॉक्टरांचे प्रश्न आणि त्यांच्या कल्याणासाठी त्यांनी सक्रिय योगदान दिले.

या यशाबद्दल घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, विभागप्रमुख डॉ. शैलजा राव, सहाय्यक प्राध्यापक डॉ. महेश पाटील आणि डॉ. झेबा फिरदोस यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. देशमुख यांच्या यशामुळे घाटीच्या शैक्षणिक लौकिकात भर पडली असून, त्यांच्या कामगिरीचे वैद्यकीय क्षेत्रातून कौतुक होत आहे.

फार्मासिस्ट हे रुग्ण आणि आरोग्यसेवेतील विश्वासाचे दुवे : केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

एमजीएममध्ये जागतिक फार्मसी दिन व राष्ट्रीय फार्मसी सप्ताहानिमित्त विशेष कार्यक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : आरोग्य व्यवस्थेमध्ये फार्मासिस्टची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, औषधांची गुणवत्ता, सुरक्षित वापर आणि रुग्णांना योग्य मार्गदर्शन करण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे. फार्मासिस्ट हे रुग्ण आणि आरोग्यसेवा यांच्यातील विश्वासाचे महत्त्वपूर्ण दुवे आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस आणि वाय. बी. चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक फार्मसी दिन व राष्ट्रीय फार्मसी



सप्ताहानिमित्त एमजीएमच्या रुक्मिणी सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. 'स्वस्थ भारत - अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्सविरुद्ध लढा' ही यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना होती.

यावेळी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. मोंटूकुमार पटेल, हिंदुस्थान अँटिबायोटिक्सचे माजी व्यवस्थापकीय संचालक यशवंत घारपुरे, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. (डॉ.) विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, डॉ. सचिन भागवत, प्रकाश वंजारी, डॉ. श्रीकांत जोशी, डॉ. संजय तोष्णीवाल, डॉ. एम. एच. देघान, एस. आर. लाहोटी, डॉ. हेमंत जैन आदी उपस्थित होते.

फार्मासिस्ट औषधनिर्मिती, संशोधन, गुणवत्ता नियंत्रण, रुग्णसेवा, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य अशा विविध क्षेत्रांत योगदान देत आहेत. औषधांचा योग्य वापर आणि रुग्णांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे जाधव यांनी सांगितले. डॉ. मोंटूकुमार पटेल यांनी फार्मसी क्षेत्रातील भारतीय विद्यार्थी व व्यावसायिकांच्या कामगिरीचा उल्लेख केला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार फार्मसी अभ्यासक्रमात आवश्यक बदल करण्यात आले असून, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि वैद्यकीय उपकरणांसंबंधी विषयांचाही समावेश करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कुलगुरू प्रा. (डॉ.) विलास सपकाळ यांनी संशोधन आणि ज्ञानाधारित नवउद्योगांच्या माध्यमातून फार्मसी क्षेत्रात मूल्यनिर्मितीच्या मोठ्या संधी असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांनी प्रतिजैविकांचा अनावश्यक वापर टाळण्याबाबत आणि प्रतिजैविक प्रतिरोधाच्या समस्येबाबत समाजात जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय तोष्णीवाल यांनी केले, तर डॉ. एम. एच. देघान यांनी आभार मानले. कार्यक्रमाला संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

म्हाडाच्या घरांसाठी अर्जदारांची झुंबड; 204 मालमत्तांसाठी 2,642 अर्ज

ऑनलाइन सोडत उत्साहात; 25 कोटी 62 लाखांच्या महसुलाची अपेक्षा, हक्काच्या घरासाठी नागरिकांची मोठी पसंती

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांची धडपड पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. म्हाडाच्या छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर आणि लातूर जिल्ह्यांतील २०४ घर, भूखंड आणि व्यावसायिक गाळ्यांसाठी आयोजित ऑनलाइन सोडतीला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. अवघ्या २०४ मालमत्तांसाठी तब्बल २ हजार ६४२ अर्ज दाखल झाल्याने घरांच्या वाढत्या मागणीचे चित्र स्पष्ट झाले आहे. या सोडतीतून मंडळाला २५ कोटी ६२ लाख रुपयांचा महसूल अपेक्षित आहे.

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी वैभव केदारे यांच्या उपस्थितीत ही सोडत प्रक्रिया पार पडली. यामध्ये विविध उत्पन्न गटांतील नागरिकांसाठी ९७ निवासी सदनिका, १०५ निवासी भूखंड आणि दोन बैठ्या व्यावसायिक गाळ्यांचा समावेश होता. सोडतीच्या पारदर्शकतेसाठी संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आणि आभासी पद्धतीने राबविण्यात आली.

या सोडतीमध्ये म्हाडा गृहनिर्माण योजना आणि २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना अशा दोन योजनांचा समावेश होता. म्हाडा गृहनिर्माण योजनेंतर्गत १०७ भूखंड व गाळ्यांसाठी ६५६ अर्ज प्राप्त झाले, तर २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत ९७ निवासी सदनिकांसाठी तब्बल १ हजार ९८६ अर्ज दाखल झाले. सदनिकांच्या तुलनेत अर्जांची संख्या मोठी असल्याने घरांसाठी असलेली नागरिकांची प्रतीक्षा आणि मागणी पुन्हा एकदा समोर आली आहे.

महसुलाच्या दृष्टीनेही ही सोडत मंडळासाठी महत्त्वाची ठरणार आहे. म्हाडा गृहनिर्माण योजनेतून सुमारे २५ कोटी रुपये, तर २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतून ६२ लाख रुपये असे एकूण २५ कोटी ६२ लाख रुपये मंडळाला प्राप्त होण्याची अपेक्षा आहे.

छत्रपती संभाजीनगर मंडळाने आजपर्यंत २२ हजार ७९ सदनिका, व्यावसायिक गाळे आणि भूखंडांची निर्मिती केली आहे. त्यापैकी सुमारे ९० टक्के मालमत्तांचे यशस्वी वितरण करण्यात आले आहे. सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घरांच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत आतापर्यंत ७४८ सदनिकांचे वितरण करण्यात आले आहे.

दरम्यान, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गतही मंडळाने मोठे काम केले आहे. या योजनेंतर्गत एकूण २ हजार ७८३ सदनिकांची निर्मिती करण्यात आली असून, त्यापैकी १ हजार २३१ सदनिकांचे वितरण पूर्ण झाले आहे. त्यामुळे परवडणाऱ्या घरांच्या उपलब्धतेसाठी म्हाडाच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रयत्नांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

आजची सोडत आभासी पद्धतीने पार पडल्याने अर्जदारांना घरबसल्या संपूर्ण प्रक्रिया पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. यासाठी ऑनलाइन यूट्यूब लिंक देण्यात आली होती. सोडत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निकाल त्याच दिवशी सायंकाळी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले.

या वेळी निवृत्त जिल्हा न्यायाधीश एस. जी. शेट्ये, अपर जिल्हाधिकारी ए. एम. शिंदे, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राचे जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी व्ही. एस. शेळके आणि मंडळाच्या उपमुख्य अधिकारी संगीता एच. बहुरे यांची उपस्थिती होती.

एकीकडे घरांच्या किमती वाढत असताना सर्वसामान्यांसाठी परवडणाऱ्या घरांचा पर्याय म्हणून म्हाडाकडे पाहिले जात आहे. २०४ मालमत्तांसाठी आलेले २ हजार ६४२ अर्ज ही केवळ सोडतीला मिळालेली पसंती नसून, स्वतःच्या घरासाठी धडपडणाऱ्या हजारो कुटुंबांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब आहे. मात्र, वाढती मागणी लक्षात घेता आगामी काळात अशा योजनांमधून अधिकाधिक घरे उपलब्ध करून देण्याचे आव्हानही म्हाडासमोर असणार आहे.

फळपिक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी 'फार्मर आयडी' अनिवार्य

परभणी जिल्ह्यात मृग व आंबिया बहारासाठी योजना लागू

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना सन 2026-27 या वर्षासाठी परभणी जिल्ह्यात राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. भारतीय कृषी विमा कंपनी लि. यांच्यामार्फत मृग व आंबिया बहारातील अधिसूचित फळपिकांसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रिस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक (फार्मर आयडी) अनिवार्य करण्यात आला असून, शेतकऱ्यांनी तो तातडीने काढून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी केले आहे.

मृग बहार 2026-27 मध्ये चिकू, डाळिंब, पेरू, मोसंबी, लिंबू, संत्रा, सीताफळ व हळद या पिकांचा, तर आंबिया बहारात आंबा, केळी, डाळिंब, पपई, मोसंबी व संत्रा या पिकांचा समावेश आहे. फळपिकांसाठी निश्चित केलेल्या हवामान धोक्यांच्या निकषांनुसार विमा संरक्षण देण्यात येणार आहे.

शासनाच्या1 11 एप्रिल 2025 रोजीच्या निर्णयानुसार आणि 15 मे 2025 रोजी झालेल्या राज्यस्तरीय पीकविमा समन्वय समितीच्या सूचनांनुसार कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. त्यामुळे फळपिक विमा योजनेत सहभागी होण्यापूर्वी शेतकऱ्यांनी ॲग्रिस्टॅक प्रणालीवर नोंदणी करून फार्मर आयडी प्राप्त करणे आवश्यक आहे.

विमा हप्ता भरण्यासाठी संत्रा पिकासाठी चार हजार रुपये विमा हप्ता येत असून, 1 लाख रुपयांचे पिक संरक्षित होते. त्यासाठी 30 नोव्हेंबरपर्यंत विमा काढता येणार आहे. तसेच डाळिंब 13600 रुपयांमध्ये 1 लक्ष 60 हजार रुपयांचे पिक संरक्षित होत असून, 14 जानेवारी 2027 पर्यंत विमा काढून घेता येणार आहे.

केळी उत्पादक शेतकऱ्यांनी 14 हजार 450 रुपयांत एक हेक्टरचा विमा काढून 1 लक्ष 70 हजार रुपयांचे पिक संरक्षित करून घ्यावे. केळीसाठी 15 नोव्हेंबर ही अंतिम मुदत आहे. तर आंबा पिकासाठी 6800 रुपयांचा विमा हप्ता येत असून, त्यातून 1 लक्ष 70 हजार रुपयांपर्यंत पिकांचे संरक्षण करता येईल. त्यासाठी आंबा उत्पादक शेतकऱ्याने 31 डिसेंबरपर्यंत विमा काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तरूणाला चाकूने भोसकून केले ठार; शिवीगाळ बेतली जीवावर गुन्हा दाखल

परभणी शहरातील गंगाखेड रोडवरील फरीद कॉलनी येथील घटना

परभणी : मध्ये गेले अनेक दिवसापासून काही ना काही कारणावरून भांडणं तंटे मारामाऱ्या खून प्रकरण चालूच आहे येथील नागरिकांमध्ये कायदा व सुव्यवस्था याची भीती राहिलीच नसल्यामुळे हे प्रकरण घडत आहेत त्यातीलच एक प्रकार असा आहे की तू नेहमीच जोरजोराने सेविकाळ का करतोस आमच्या घरात आई बहिणी आहेत तू अर्वाची भाषेमध्ये शिवीगाळ करत जाऊ नकोस असं म्हणत राग धरून युवकाला घराबाहेर नेऊन चाकूने भोसकण्यात आले गुप्त भागावर जबर मारहाण झाल्यामुळे युवकाचा जागीच मृत्यू झाला ही घटना दोन नोव्हेंबर शहरात रात्री पावणे बाराच्या सुमारास गंगाखेड रोडवरील पारित कॉलनी भागात घडली सदर प्रकरणी चौघा जनावर कोतवाली पोलिसात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून.

याबाबत अधिक माहिती अशी की क्षमा खान यांनी तक्रार दिली आहे इरफान खान हबीब खान वय 31 वर्ष असे मैतांचे नाव असून फिर्यादीचा मुलगा दोन नोव्हेंबरच्या रात्री साडेअकरा बाराच्या सुमारास कामावरून घरी आला इरफान याने गर्मी होत आहे कुलर लावा असे म्हणल्यावर कुलरची पाती तुटले आहेत कुलर लावता येणार नाही असे उत्तर फिर्यादीने दिले त्यानंतर इरफान ने रागात वडिलांना शिव्या सुरु केली ही शिवीगाळ ऐकून बाजूला राहणारे घर मालक शेख लतीफ शेख एजाज शेख साबिर शेख बघू आले त्यांनी इरफान लातूर नेहमीच जोरजोरात भांडण करून शिवीगाळ का करतोस आमच्या घरात आई बहिणी आहेत असे म्हणत मारहाण केली त्याच्या मान्यला धरून घराबाहेर पडत नेले आणि धारदार शस्त्राने चाकूने त्याच्यावर वार केले त्यामध्ये त्याच्या गुप्त अंगावर चाकूने वार वर मी लागल्यामुळे तो जखमी अवस्थेमध्ये उपचारासाठी शासकीय रुग्णालयात देण्यात आले त्या ठिकाणी त्याला परभणीतील एका खाजगी रुग्णालय दाखल करण्यात आले.

प्रशासन अधिकारी संजीव सोनार यांचा जल्लोषात सेवा पूर्ती गौरव

प्रियदर्शनी शाळेच्या विकासात सोनार यांचे मोठे योगदान; मान्यवरांकडून गौरव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिका प्रशासन अधिकारी तथा केंद्रीय मुख्याध्यापक संजीव लक्ष्मणराव सोनार हे ३१ ऑक्टोबर रोजी नियमित वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त शाळेच्या मैदानावर त्यांचा सेवा पूर्ती गौरव सोहळा उत्साहात पार पडला. महापौर समीर राजूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात सोनार यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्याचा गौरव करण्यात आला.

सोनार यांच्या इच्छेनुसार हा सोहळा शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला. प्रमुख पाहुणे, कुटुंबीय,



शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या उपस्थितीत लेझीम, ढोल-ताशे, शिवकालीन खेळ आणि फुगडी अशा मराठमोळ्या वातावरणात त्यांची मिरवणूक काढण्यात आली. फुलांच्या रांगोळीतून त्यांच्या जीवनातील महत्त्वाची वर्षे रेखाटण्यात आली. या वर्षांशी निगडित आठवणीही यावेळी उलगडण्यात आल्या.

महापौर समीर राजूरकर यांनी संजीव सोनार व त्यांच्या पत्नी आरती सोनार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला. प्रियदर्शनी शाळेचा कायापालट करण्याबरोबरच माध्यमिक विद्यालय आणि सीबीएसई शाळा सुरू करण्यात सोनार यांचा सिंहाचा वाटा असल्याचे महापौरांनी नमूद केले. विरोधी पक्षनेते समीर साजिद यांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी नृत्याच्या माध्यमातून सोनार यांच्या जीवनातील विविध प्रसंग सादर करत त्यांचा जीवनप्रवास उलगडला. सोनार यांच्या स्नुषा हर्षा सोनार यांनी ते कुटुंबाला एकत्र ठेवणारे आणि आपल्याला मुलीप्रमाणे वागवणारे प्रेमळ व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगितले. शाळेतील चिमुकल्यांनी व्यक्त केलेल्या भावना आणि मनोगतांमुळे उपस्थितांचे मन गहिवरले.

नगरसेविका अर्चना निळकंठ, शिक्षिका रश्मी होनमुटे आणि शशिकांत उबाळे यांनी मनोगत व्यक्त केले. उपायुक्त अंकुश पांढरे यांनी सोनार यांच्या कार्याचा गौरव करताना विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ, मनपा शाळांविषयीची आपुलकी आणि लोकांना जोडण्याची हातोटी यांचा उल्लेख केला. महानगरपालिका शाळांसाठी सीएसआरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी मिळवून देणारे एकमेव मुख्याध्यापक म्हणूनही त्यांनी सोनार यांचा उल्लेख केला. कोणतेही काम करताना 'नाही होणार' हा शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हता, असेही पांढरे म्हणाले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911